

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.



## मराठी विभाग २०२३-२४

### INFOTENMENT CLUB (जोगवा –चित्रपट)

## अहवाल

दि.२७/१२/२०२३

आपल्या महाविद्यालयामध्ये **INFOTENMENT CLUB** कार्यरत आहे. या क्लब मार्फत विविध विषयावरील माहितिपर 'चित्रपट' दाखविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून मराठी विभागामार्फत बुधवार दि.२७ डिसेंबर रोजी सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.राजन गवस यांच्या 'चौंडक आणि भंडारभोग' या कथा व चारुता सागर यांच्या 'दर्शन' या कादंबरीवर आधारित सामाजिक जाणीव व्यक्त करणारा 'जोगवा' हा चित्रपट दाखविण्यात आला. जोगवा हा चित्रपट २००९ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मुक्ता बर्वे, उपेंद्र लिमये यांनी या चित्रपटात प्रमुख भूमिका केल्या आहेत. यावेळी उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे, प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे, प्रा.समाधान बनसोडे आदी उपस्थित होते.

**परिणाम/निष्पती**

- विद्यार्थ्यांमध्ये सामजिक जाणीव निर्माण झाली.
- समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा याची माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांमध्ये चित्रपट माध्यमाविषयी जाणीव जागृती झाली.

**लाभार्थी**
५२




जोगवा चित्रपटातील दृश्य




जोगवा चित्रपटाचा आस्वाद घेताना विद्यार्थी

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.